# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.३०४/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२२.

प्रति,

उपवनसंरक्षक, पुणे.

विषय:-वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना प्रमुख जिल्हा मार्ग- ८४, खडकी ते भवानी नगर रोड या रस्त्याच्या कामाकरीता शेटफळगढे ता. इंदापूर, जि.पुणे येथील ०.९४ हे. राखीव वनजमीन वळतीकरणाबाबत.

संदर्भ:- १) शासनाचे समक्रमांकाचे पत्र, दिनांक २९.११.२०२२.
२) आपले पत्र क्र. अ/कक्ष-४.२/जमीन/२६३/२०२२-२३, दि. ०९.१२.२०२२

विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने रस्त्याच्या कामासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे शेटफळगढे येथील गट नं. ६६, येथील क्षेत्राच्या ७/१२ उताऱ्यावर खाजगी हक्कधारकांची नावे आहेत. सबब, खाजगी हक्क धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र आणि प्रकल्पासाठी प्रस्तावित क्षेत्र तसेच पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्रांची KML File सादर करण्याबाबतसंदर्भाधीन क्र. २ येथील दिनांक २९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वयेकळविले होते.

त्यास अनुसरून आपण संदर्भाधीन क्र. ३ येथील दिनांक ०९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वयेप्रस्तावित रस्त्याच्या कामासाठी प्रत्यक्षातवनक्षेत्राचे वळतीकरण मौजे शेटफळगढे येथील गट नं. ६७ मधूनच होत आहे व त्याचे क्षेत्र नकाशातील आकारानुसार जुळत आहे. यापूर्वी सदर प्रस्तावामध्ये प्रकल्प यंत्रणेकडून नजरचुकीने गट नं.६६ चा ७/१२ जोडण्यात आला होता, असे नमूद केले आहे.

३. आपण प्रस्तावित रस्त्याच्या कामासाठी वळती करावयाची जमिन ही मौजे शेटफळगढे येथील गट नं. ६६ मधील नसून, गट नं. ६७ येथील असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदर बदलेल्या प्रस्तावित जमिनीचे अभिलेख, जसे की, मौजे शेटफळगढे येथील गट नं. ६७ मधील एकूण प्रस्तावित क्षेत्र, जमिनीचे क्षेत्रफळ, वैधानिक दर्जा, KML File इ. माहिती / कागदपत्रे सादर करावीत.

तसेच, संदर्भाधीन क्र. ३ येथील दिनांक ०९.१२.२०२२ रोजीच्या पत्रासोबत सादर केलेल्या प्रस्तावित रस्त्यांच्या KML File चे अवलोकन केले असता, KML File मध्ये रस्त्यांचा क्रमांक, वळती करावयाच्या क्षेत्राच्या गावाचे नाव, गट नं./सर्व्हे नं., कंपा. क्र. इत्यादी माहिती दिसून येत नाही. सबब, सुधारित KML File सादर करावी.

४. उक्त परि. क्र. ३ मधील मुद्यांची माहिती केंद्रस्थ अधिकारी यांच्या मार्फत शासनास तात्काळ सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

२) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे.

३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे